# नकार देण्याआधी

गेल्यावेळच्या लेखात आपण जोडीदार निवडीच्या प्रवासात 'नकार देताना आणि घेतानाही' घाबरण्याचं, बिचकण्याचं किंवा कमी वाटून घेण्याचं काहीच कारण नाही हे बघितलं. पण प्रत्यक्ष नकार देण्यापूर्वी आपण काय काय विचार केला पाहिजे, कुठल्या निकषांवर निर्णयापाशी यायला पाहिजे याबाबत आज चर्चा करूया.

"कितीही स्थळे पुढ्यात ठेवली तरी माझी मुलगी नकारच देते हो..." असं सांगणारे कितीतरी पालक मला भेटत असतात. मुलींचे आणि मुलांचेही एकदा अशाच अंजलीताई आपल्या मुलीला, मधुराला घेऊन आल्या होत्या. तक्रार हीच नेहमीची- कारण नसताना स्थळे नाकारणे. "कारण नसताना? तुला ते कारण महत्वाचं वाटत नसेल पण मला वाटतं ना!", मधुरा एकदम उसळलीच आपल्या आईच्या आरोपावर. त्यावर तिला मी थोडं शांत करून विचारलं, "नेमकी काय काय कारणं असतात तुझी नकार देताना?" माझा प्रश्न संपायच्या आतच मधुरा ऐवजी अंजलीताईच एकदम बोलल्या, "मुलाचं नाव दत्तात्रय आहे असं नकाराचं कारण होतं तिचं मागच्या वेळी!" आपल्या आईच्या या मध्येच बोलण्याने वैतागून निकराच्या भाषेत मधुरा म्हणाली, "दत्तात्रय हे किती old fashioned नाव आहे. लग्नाच्या पत्रिकेवर सुद्धा किती विचित्र दिसेल- 'मधुरा- दत्तात्रय यांचा विवाह'. मला नाही हे चालायचं"

असेच एकदा श्यामराव आपल्या मुलाला सुजितला घेऊन भेटायला आले होते. आणि सुजित मधुरा प्रमाणेच ठामपणे सांगत होता "त्या मुलीला चष्मा आहे म्हणून मी नकार दिला. शिवाय जरा जाडही होतीच ती." मधुरा काय आणि सुजित काय, दोघे आजच्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. नेमके आपण कोणत्या कारणाने स्थळ नाकारतो आहोत हे न समजणाऱ्या तरुणाईचे ते प्रतिनिधी आहेत. आणि तरुणच का, पालकही कित्येकदा अनाकलनीय कारणामुळे स्थळे नाकारतात. बहुतांशवेळा मुलं-मुली आणि त्यांचे पालकही 'काय हवं' ची कल्पना घेऊन जोडीदाराचा शोध सुरु करतात आणि मग त्यातच इतके अडकून पडतात की कित्येक चांगली मुलं-मुली जी आपला भावी अनुरूप जोडीदार होऊ शकली असती ती सरळ दुर्लक्षित राहतात. अनेकजण अपेक्षांमध्ये लवचिकता म्हणजे 'झुकणे' असा काहीसा समज करून घेणारेही असतात. 'काय हवं' यावर इतके अडून बसतात की लग्न ठरणं मुश्कील होत जातं. आता देशपांड्यांच्या मुलीचं उदाहरण बघूया. देशपांडे आपल्या मुलीसाठी स्थळे शोधताना कंप्युटर इंजिनियर सोडून एकाही स्थळाला ते हात देखील लावत नव्हते. 'माझी मुलगी बहुराष्ट्रीय कंपनी मध्ये काम करते. तिच्या कामाच्या वेळा वगैरे समजून घेण्यासाठी तशीच नोकरी असणारा मुलगा असलेला बरा' असा विचार यामागे होता. पहिली चाळणी इतकी कडकपणे लावल्यावर त्यांच्या समोरचे पर्याय कमी झाले. मग पुढे पुढे अजूनही अशाच कठोर चाळण्या होत्याच. साहजिकच विवाहसंस्थेत नाव नोंदवून दहा महिने उलटले तरी लग्न काही ठरेना. याचं कारण त्यांचा जोडीदाराचा शोध 'काय हवं' पासून सुरु झाला होता.

लहानपणापासून बघितलेले सिनेमा, नाटकं, आपल्यावर प्रभाव टाकणारे मित्र, नातेवाईक, पुस्तकं, कादंबऱ्या आपण जिथे बहुतांश वेळ घालवतो ते घर, कॉलेज, ऑफिस आणि एकूणच आलेले बरे वाईट अनुभव या सगळ्यांना सोबत घेऊन आपण सर्वचजण भविष्याचा विचार करत असतो. तरुण वयात किंवा लग्नाचं वय झाल्यावर या विचारांमध्ये आपला जोडीदार कसा असावा हा विचार डोकावू लागतो. आणि मग आपण आपल्या जोडीदाराचे एक चित्र मनात रेखाटतो. इथपर्यंत सगळं ठीक असतं. पण जेव्हा मला या रेखाचित्रात असणारा जसाच्या तसा जोडीदार पाहिजे म्हणून अट्टाहास धरून बसतो तेव्हा खरी गडबड सुरु होते. मला वाटतं, आपल्या जोडीदाराबद्दलचं रेखाचित्र थोडंसं बाजूला ठेवून (अगदीच कचऱ्यात टाकून नव्हे!), जोडीदार निवडीचा प्रवास हा 'काय हवं' पेक्षा 'काय

नको' याची यादी पक्की करून सुरु करावा. असं का? कारण यामुळे आपण विविध शक्यतांचा आढावा घेऊ शकतो. उदाहरणार्थ, काय हवं मध्ये देशपांड्यांनी कंप्युटर इंजिनियरच हवा असं लिहिलं होतं. त्यांना 'काय नको'ची यादी करायला सांगितली तेव्हा ती यादी डॉक्टर, वकील, कमी शिकलेला या पलीकडे गेली नाही. याचं कारण असं की, सामान्यतः माणूस हा स्वतः करतो त्या गोष्टींची कारणमीमांसा शोधायचा प्रयत्न करत असतो. जेव्हा देशपांडे म्हणत होते 'कंप्युटर इंजिनियरच हवा' तेव्हा ते त्यामागे असणारी कारणं ते सहजपणे देऊ शकत होते. पण सक्रियपणे (pro actively) नको म्हणावं अशी फार क्षेत्र त्यांना दिसली नाहीत. त्यांची कारणंही सांगता आली नाहीत. साहजिकच सक्रियपणे नको न म्हणलेल्या क्षेत्रातल्या मुलांचे पर्याय त्यांच्या मुलीसाठी जोडीदार म्हणून उपलब्ध झाले ! 'काय हवं' पेक्षा 'काय नको' ची यादी करण्याचा हा सगळ्यात मूलभूत आणि मोठा फायदा असतो. आपण असंख्य पर्याय खुले करत असतो.

'काय नको'ची यादी करताना तीन महत्वाच्या गोष्टी आपल्याला लक्षात ठेवाव्या लागतात, एक म्हणजे 'कोणत्याही परिस्थितीत नकोच' अशाच गोष्टी यात असाव्यात ('नसल्या तर बरं'वाल्या नव्हेत), त्या सर्व गोष्टींमागे कारणमीमांसा असावी आणि तिसरं म्हणजे त्या गोष्टी मूल्यांवर आधारलेल्या असाव्यात. या तीन कसोट्यांवर आधारित आणि स्वतःलाच प्रश्न विचारत आपण 'काय नको' ची यादी तयार केली तर जोडीदाराचा शोध घेण्याचा आपला प्रवास अधिक सुकर होईल. 'चष्मा नको पण लग्नानंतर लागू शकतो, अशावेळी काय करणार?' हा प्रश्न आपण 'काय नको'च्या यादीत चष्मा नको असं लिहिलं असल्यास स्वतःला विचारायला हवा. 'जाड आज नाही पण उद्या होऊ शकतो/शकते'; 'एखाद्याचे नाव दत्तात्रय किंवा पांडुरंग असे old fashioned वगैरे असेल तर त्यामुळे तो मुलगाही खरंच old fashioned होतो का?'. 'काय नको'ची यादी करताना आपला जोडीदार कोणत्या मूल्यांना मानणारा असावा, त्याच्यात/तिच्यात कोणते गुण असावेत याचा प्राधान्याने विचार व्हायला पाहिजे. निर्व्यसनी असावा की नको? स्त्री-पुरुष समानता हे खरंच मनापासून मानणारा असावा की नको? कुटुंबवत्सल असावा की नको? ठरवेन ते करून दाखवेन अशी जिद्द बाळगणारा असावा का? फार महत्वाकांक्षी चालेल काय? 'आपण बरं आपलं काम बरं' या विचारसरणीचा असू नये असं आपलं म्हणणं आहे काय? हे आणि असे असंख्य प्रश्न आपण स्वतःला विचारले पाहिजेत. याच्या उत्तरांमध्ये चूक किंवा बरोबर असं काही नसतं. प्रत्येकाची या प्रश्नांवर असणारी उत्तरं वेगळी असतील. पण ती उत्तरं स्वतःलाच मिळणं आवश्यक आहे. स्वतःलाच मिळत जाणारी ही उत्तरंच जोडीदार निवडीच्या प्रवासात खरे मार्गदर्शन करेल याबद्दल शंका नाही. स्वतःला विचारायचे हे प्रश्न शोधताना, त्यांची उत्तरं शोधताना, 'काय नको'ची यादी करताना अडखळायला होईल, पण भानावर राहून, तर्कशुद्ध विचार करत आणि गरज वाटल्यास समुपदेशकाची मदत घेत वाटचाल केल्यास स्वतःच्या हव्या असलेल्या जोडीदाराकडून असणाऱ्या अपेक्षा निश्चित करणारा हा प्रवास कठीण नाही!